**अहिल्यानगर महानगरपालिका अहिल्यानगर**

नगरसचिव विभाग

प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर रोड,अहिल्यानगर

**मा. प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - ५५ विषयाबाबतचे निर्णय**

**मा.प्रशासक ठराव क्रमांक - १८४** **दिनांक – ३०/०७/२०२५**

**विभाग – प्रकल्प विभाग**

---

**प्रस्तावाचा विषय** – अहिल्यानगर महानगरपलिकेच्या मालकीच्या केडगाव सर्व्हे नं. २०६/१अ या ठिकाणी प्रधानमंत्री आवास योजना २.० AHP घटक राबविणेबाबत .

--**--

**ठराव** – विभागाने प्रस्ताव सादर केल्यानुसार अहिल्यानगर महानगरपलिका हद्दीमध्ये मनपाच्या मालकीची केडगाव सर्व्हे नं. २०६/१अ या ठिकाणी जागा उपलब्ध आहे. एकूण जागेचे क्षेत्रफळ २५७०० चौमी इतके आहे.त्यापैकी मनपामार्फत विकसित करण्यात येणा-या ई -बस डेपो करीता १५०६९ चौमी इतकी जागा देण्यात आली आहे. उर्वरित १०६३१ इतकी जागा शिल्लक राहत आहे.

सदर ठिकाणी २०१९-२० साली मनपामार्फत प्रधानमंत्री आवास योजना १.० या योजनेस मा. केंद्रशासनाच्या CSMC मिंटींग क्रमांक ३३ दि. २७/०४/२०२५ रोजी प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली होती. त्यानुसार सदर प्रकल्पाच्या बांधकामाकरीता एजन्सीची नियुक्ती करून प्रत्यक्षात बांधकाम सुरू करण्याचे नियोजन होते परंतु कोव्हीडच्या प्रार्दुभावामुळे लाभार्थ्यांचा अत्यंत कमी प्रतिसाद मिळाल्यामुळे सदर प्रकल्प मा. केंद्रशासनाच्या या CSMC मिंटींग क्रमांक ६६ दि. १०/०५/२०२३ अन्वये रद्द करण्यात आला.

सद्दस्थितीत मनपामार्फत नालेगाव सर्व्हे नं. ४४ या ठिकाणी ५०४ सदनिका व मूलभूत सुविधांचा प्रकल्प मंजुरीस्तव मा. शासनाकडेस सादर केला आहे. सदर प्रकल्पास नागरीकांकडुन प्रतिसाद मिळत आहे. केडगाव भागातील अनेक इच्छुक अर्जदार यांनी केडगाव या ठिकाणी अशा प्रकारचा प्रकल्प विकसित करणेबाबत प्रकल्प विभागाकडेस पाठपुरावा करीत आहेत. त्यानुसार केडगाव उपनगरात प्रकल्प राबविणे योग्य वाटते.

सद्दस्थितीत सर्व्हे नं २०६/१अ या ठिकाणी १०६३१ चौमी जागा शिल्लक असल्याने मोटर व्हेईकल विभाग प्रमुख यांचा जागेच्या उपलब्धतेबाबत अभिप्राय घेण्यात आला, या मध्ये मोटर व्हेईकल विभाग प्रमुख यांनी ई- बससाठी सद्यस्थितीत वापरण्यात येत असलेली जागा पुरेशी आहे, असा अभिप्राय दिला आहे. त्यामुळे उर्वरित १०६३१ चौमी जागेवर अंदाजे २०० सदनिका व मूलभूत सुविधांचा प्रकल्प राबविणे शक्य होईल.

करीता अहिल्यानगर महानगरपलिकेच्या सर्व्हे नं. २०६/१ अ या ठिकाणी प्रधानमंत्री आवास योजना २.० AHP घटकअंतर्गत घरकुल योजना प्रकल्प राबविणेस व तसेच प्रधानमंत्री आवास योजना AHP घटकअंर्तगत नियुक्त करणेस मा. प्रशासक सर्व साधारण सभा मंजूरी देत आहे

---------------------------------------------------------------------------------------

**निर्णय** - महाराष्ट्र शासन.नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ - २०२३/प्र.क्र. ४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत ) मुंबई -३२ दि. २८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा. महासभेच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा. प्रशासक यांनी मंजुरी दिली.

( सही )
( मेहेर लहारे )
प्र. नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका

( सही )
( यशवंत डांगे )
प्रशासक
अहिल्यानगर महानगरपालिका

**अहिल्यानगर महानगरपालिका अहिल्यानगर**
नगरसचिव विभाग
प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर रोड,अहिल्यानगर

**मा. प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - ५५ विषयाबाबतचे निर्णय**
**मा.प्रशासक ठराव क्रमांक - १८५** **दिनांक – ३०/०७/२०२५**
**विभाग – बांधकाम विभाग**

---

**प्रस्तावाचा विषय** – प्रभाग क्रमांक ९ मध्ये चौक सुशोभिकरणास अडथळा ठरणारे शौचालय स्थलांतरीत करणे बाबत.

--**--

**ठराव** – विभागाने प्रस्ताव सादर केल्यानुसार मा. नगरसेविका सौ. सुप्रिया धनंजय जाधव यांचा दिनांक १३/१२/२०२३ चा अर्जानुसार सादर की, मा. उपायुक्त यांनी दिनांक १४/१२/२०२३ रोजी दिलेल्या अभिप्रयामध्ये एक्स प्रमाणे नवीन प्रस्ताव ऑनलाइन तयार करून सादर करा त्यामध्ये एक नमूद असलेला अभिप्रयामध्ये इकडील अभिप्राय असा होतो की विभागाने सादर केलेला प्रस्ताव हा दोन रस्तयामध्ये असणारे विविध आरक्षणाचे व विना वापर पडलेल्या जागेचे एकत्रीकरण करून त्यांचे मनपाला उत्पन्न हेईल अशा पध्दतीने व्यापारी संकुल होऊ शकते.

सदर प्रस्ताव मा. प्रशासक महासभेकडे धोरण निश्चित करणे कामी व धोरणानुसार पुढील कार्यवाही प्रकल्प विभागांमधील राबवणे कमी प्रस्ताव मान्यतेनुसार सदरचा संपूर्ण संचिका प्रकल्प विभागाकडे पाठवली असता प्रकल्प विभाग प्रमुख यांनी सदर नस्ती घेण्यास नकार दिला असून सदर जावक रजिस्टर देखील अभिप्राय नोंदवण्यास नकार दिलेला आहे. प्रत्यक्षात मा. आयुक्त विविध प्रकल्प हे प्रकल्प विभागांमध्ये करण्यासाठी प्रभावीत आहेत परंतु सदर प्रकल्प हा प्रकल्प विभागाने घेतलेला नाही

सदर कामाबाबत माजी नगरसेवक श्री. धनंजय जाधव हे देखील मा. आयुक्त यांच्याशी प्रत्यक्ष भेट घेऊन वेळोवळी संपर्कात आहेत त्यामुळे प्रत्यक्षात सदर ठिकाणी मोठी जागा ही व्यावसायिक असून सदर जागेच्या दोन्ही बाजूस डीपी रस्ते आहेत त्यामुळे सदर जागा मध्ये विविध आरक्षण आहेत जसे प्रथमता अस्तित्वातील शौचालय तदनंतर खुली जागा तदनंतर व्यायामशाळा तदनंतर विना वापर पडलेले जागा, काही मंदिर, इमारत तदनंतर मनपाची उर्दू शाळा असे मोठा भूखंड आहे. त्यामुळे सदरचा भूखंड हा विविध करणास्तव असलेला विना वापर पडले असल्याने एकत्रीकरण करून व्यावसायिक पध्दतीने मनपाला उत्पत्र होईल अशा पध्दतीने विकसित करता येणे शक्य आहे.

सदर प्रस्तावित हे रिपोर्ट मध्ये सादर केल्याने सर तितक्यासा आवश्यकता वाटणार नाही परंतु त्याकरिता माननीय आयुक्त यांच्या समवेत मा. उपायुक्त मा. नगररचनाकार, घनकचरा विभाग प्रमुख व संबंधित श्री. धनंजय जाधव यांच्या समवेत पाहणी केल्यास त्याबाबत वेगळी कल्पना येण्यास

देखील मदत होईल तदनंतर सदरचा प्रकल्प हा बांधकाम विभागामार्फत करावा किंवा प्रकल्प विभागामार्फत करावा याबाबत देखील सांगोपांग चर्चा होऊ शकते
तरी विभागाने प्रस्तावित केल्यानुसार सदर ठिकाणी असलेल्या शौचालया शेजारील मुतारी जमिन दोस्त करून जागा मोकळी करावी त्याचे निर्लेखन करणेस मा. प्रशासक सर्व साधारण सभा मंजूरी देत आहे

---

**निर्णय** - महाराष्ट्र शासन.नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ - २०२३/प्र.क्र. ४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत ) मुंबई -३२ दि. २८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा. महासभेच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा. प्रशासक यांनी मंजुरी दिली.

| | |
|---|---|
| ( सही ) | ( सही ) |
| ( मेहेर लहारे ) | ( यशवंत डांगे ) |
| प्र. नगरसचिव | प्रशासक |
| अहिल्यानगर महानगरपालिका | अहिल्यानगर महानगरपालिका |